आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१४ जुलै २०२४ - रविवार

ठळक बातम्या

- गेल्या तीन ते चार वर्षांत आठ कोटी नवीन रोजगारनिर्मिती झाली असून त्यामुळे देशात बेरोजगारीबद्दलच्या अफवा पसरवणाऱ्यांना उत्तर मिळालं असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- पुरीच्या जगन्नाथ मंदिरातल्या खजिन्याचे दरवाजे उघडण्याच्या तयारीत

- अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यावर निवडणूक प्रचारसभेत हल्ला/ प्रधानमंत्री मोदी यांनी केला हल्ल्याचा निषेध

- ३५ व्या आंतरराष्ट्रीय जीवशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारताची १ सुवर्ण आणि ३ रौप्यपदकांची कमाई

आणि

- विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष एकेरीचा अंतिम सामना आज नोव्हाक जोकोविच आणि गतविजेता, कार्लोस अल्कराज यांच्यात रंगणार

<><><><><>

गेल्या तीन ते चार वर्षांत आठ कोटी नवीन रोजगारनिर्मिती झाली असून त्यामुळे देशात बेरोजगारीबद्दलच्या अफवा पसरवणाऱ्यांना उत्तर मिळालं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल झालेल्या जाहीर कार्यक्रमात या संदर्भातली आकडेवारी आणि आरबीआयच्या अहवालाचा हवाला देत, देशात कौशल्य विकास आणि रोजगाराची गरज आहे आणि सरकार या दिशेने काम करत आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. अफवा पसरवणारे गुंतवणुकीचे, पायाभूत सुविधांच्या विकासाचे आणि देशाच्या विकासाचे शत्रू आहेत, असं मोदी म्हणाले. महाराष्ट्राला जगातलं सर्वात मोठं आर्थिक शक्तिस्थान बनवणं आणि मुंबईला जागतिक

अर्थव्यवस्थेचं केंद्र बनवणं हे आपलं उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. मुंबई आणि आसपासच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमुळे शहराचा जवळच्या भागांशी संपर्क वाढेल, ज्यामुळे महिलांसाठी चांगल्या सुविधा तसंच सुरक्षितता वाढेल या मुद्याकडे मोदींनी लक्ष वेधलं. पालघरमधल्या डहाणू इथं ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदरालाही मंजुरी दिली असून, त्यातून १० लाख रोजगार निर्माण होतील असंही मोदी यांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

ओदिशात पुरी इथल्या भगवान जगन्नाथांचं रत्नभांडार आज उघडण्यात येणार आहे. ओदिशाचे कायदामंत्री पृथ्विराज हरिचंदन यांनी ही घोषणा केली होती. यासाठी मंदिराच्या मुख्य व्यवस्थापकांच्या नेतृत्वात विशेष पथकाची स्थापना करण्यात आली आहे. भारतीय रिझर्व्ह बँक आणि पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे प्रतिनिधीही या पथकात आहेत. सर्वप्रथम हे रत्नभांडार चावीनं उघडण्याचा प्रयत्न केला जाईल, ते न उघडल्यास दंडाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कुलूप तोडलं जाईल. या रत्नभांडारातले अलंकार, तसंच रत्नभांडाराच्या दुरुस्तीच्या कामाची नोंद ठेवण्यासाठी वेगवेगळ्या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या अलंकारांची शुद्धता आणि वजन यांची डिजिटल मोजदाद पारदर्शक पद्धतीनं होईल, याची जबाबदारी रिझर्व्ह बँकेच्या प्रतिनिधींची आहे. हे रत्नभांडार सुस्थितीत आहे की नाही, याचा आढावा पुरातत्व सर्वेक्षण विभाग घेणार असल्याची माहिती ओदिशा उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आणि देखरेख समितीचे अध्यक्ष विश्वनाथ रथ यांनी दिली आहे. हे रत्नभांडार चाळीस वर्षांपेक्षा जास्त काळ बंद असल्यानं ते उघडताना आवश्यक ती सर्व काळजी घेण्यात येत आहे.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल येत्या मंगळवारपासून दोन दिवस इटलीच्या दौऱ्यावर जात आहेत. तिथे रेजिओ कॅलाब्रिया इथे होणाऱ्या जी ७

व्यापार मंत्र्यांच्या बैठकीत ते सहभागी होतील. तसंच, सहभागी राष्ट्रांसोबत द्विपक्षीय चर्चा करतील. ही भेट व्यापार आणि गुंतवणुकीच्या मोठ्या संधी निर्माण करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांचं द्योतक असल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

"कायद्याची तत्त्वं सर्वसामान्यांना सोप्या भाषेत समजावून सांगता येत नसतील, तर कायद्याच्या शिक्षणात आणि व्यवसायात त्रुटी आहेत" असं भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांनी म्हटलं आहे. काल लखनौ इथल्या डॉ. राम मनोहर लोहिया नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीच्या दीक्षांत समारंभात बोलतांना चंद्रचूड यांनी प्रादेशिक भाषांमध्ये कायदा शिकवण्याच्या गरजेवर भर दिला.

<><><><><>

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यावर झालेल्या हल्ल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. प्रधानमंत्र्यांनी या घटनेचा निषेध केला असून राजकारणात आणि लोकशाहीत हिंसेला कोणतंही स्थान नाही, असं समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. ट्रंप यांच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा होवो, अशी प्रार्थना करत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. या हल्ल्यातल्या मृतांचे कुटुंबीय, जखमी व्यक्ती आणि अमेरिकी नागरिकांच्या दुःखात भारत सहभागी आहे, असंही त्यांनी सांगितलं.

अमेरिकेत पेनिसिल्व्हेनिया इथं एका प्रचार सभेदरम्यान अचानक झालेल्या हल्ल्यात डोनाल्ड ट्रंप जखमी झाले तर एक बंदूकधारी आणि एक प्रेक्षक असे दोन जण मारले गेले. जखमी ट्रंप व्यासपीठावर कोसळले असता सिक्रेट सर्व्हिस एजंट्सनी त्यांना सावरलं. त्यावेळी ट्रंप यांच्या चेहऱ्यावर रक्त ओघळत होतं. दरम्यान ट्रम्प यांची प्रकृती ठीक असून ते सुरक्षित आहेत. हल्ला झाल्यानंतर सिक्रेट सर्विसच्या जवानांनी दाखवलेल्या तत्परतेबद्दल ट्रम्प यांनी त्यांचे आभार

मानले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी या हल्ल्याचा निषेध केला असून ट्रम्प सुरक्षित असल्याबद्दल समाधान व्यक्त केलं आहे.

<><><><><>

कझाकस्तान इथं झालेल्या ३५ व्या आंतरराष्ट्रीय जीवशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये भारतानं १ सुवर्ण आणि ३ रौप्यपदकं पटकावली आहेत. मुंबईच्या वेदांत साक्रेनं सुवर्ण, तर रत्नागिरीचा इशान पेडणेकर, चेन्नईचा श्रीजीथ शिवकुमार आणि उत्तर प्रदेशातल्या बरैलीचा यशश्वी कुमार या तिघांनी रौप्यपदकाची कमाई केली. भारतीय संघाचं नेतृत्व मुंबई टीडीएम प्रयोगशाळेचे प्राध्यापक शशिकुमार मेनन, होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्र, टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या डॉ. मयुरी रेगे, आयआयटी पवईचे डॉ. राजेश पाटकर आणि बडोदा एम. एस. विद्यापीठाचे डॉ. देवेश सुथर यांनी केलं. या स्पर्धेत एकंदर ८० देशांच्या ३०५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

<><><><><>

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेच्या पुरुष एकेरीत आजचा अंतिम सामना जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला नोव्हाक जोकोविच आणि विद्यमान विजेता, स्पेनचा कार्लोस अल्कराज यांच्यात होणार आहे. संध्याकाळी साडेसहा वाजता हा सामना सुरू होईल. अल्कराजचा हा विम्बल्डनचा दुसरा अंतिम सामना आहे, तर जोकोविचनं सात वेळा या स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं आहे. आठवेळा विम्बल्डनच्या जेतेपदावर नाव कोरणाऱ्या रॉजर फेडररच्या विक्रमाशी बरोबरी साधण्याचं ध्येय जोकोविचसमोर आज आहे. तर मिश्र दुहेरीत सातव्या मानांकित यान जेलिन्की आणि सू वे शे यांच्यासमोर सँतियागो गोन्झालेस आणि जुलियाना ओलमोस यांचं आव्हान असेल.

दरम्यान, महिला एकेरीच्या काल झालेल्या अंतिम सामन्यात झेक प्रजासत्ताकच्या बार्बोरा क्रेजीकोव्हा हिनं अटीतटीच्या सामन्यात इटलीच्या जॅस्मिन

पाओलीनी हिच्यावर ६-२, २-६, ६-४ अशी मात करून पहिल्यावहिल्या विम्बल्डन जेतेपदावर नाव कोरलं.

<><><><><>

भारत - झिम्बाब्वे टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज संध्याकाळी साडेचार वाजता सुरू होईल. काल चौथ्या सामन्यात भारतानं झिम्बाब्वेवर १० गडी राखून मोठा विजय नोंदवला. प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने १५२ धावा केल्या. भारतीय सलामीवीरांनी हे लक्ष्य सोळाव्या षटकांतच गाठलं. यशस्वी जैस्वाल सामनावीर ठरला. भारताने या मालिकेत ३-१ अशी विजयी आघाडी घेतली आहे. या मालिकेतल्या पहिल्याच सामन्यात भारताला पराभवाला सामोरं जावं लागलं होतं.

<><><><><>

अमरनाथ यात्रेसाठी चार हजार ८८९ यात्रेकरुंचा जत्था आज जम्मू इथल्या भगवती नगर शिबीरातून रवाना झाला. १८७ वाहनांमधून यात्रेकरुंनी आज सकाळी आपल्या प्रवासाला सुरुवात केली. यामध्ये ३ हजार ६७२ पुरुष, एक हजार ८६ महिला, २१ बालकं, ८८ साधू आणि २२ साध्वी यांचा समावेश आहे. यापैकी १ हजार ८९६ यात्रेकरू, पहाटे बालताल बेस कॅम्पसाठी रवाना झाले तर २ हजार ९९३ यात्रेकरू पहलगाम बेस कॅम्पसाठी रवाना झाले. तिथून ते पवित्र गुहेच्या दिशेनं पुढे मार्गक्रमण करतील.

<><><><><>

भारतीय हवामानशास्त्र विभागाने आज नागालँड, ओडिशा आणि छत्तीसगडमध्ये जोरदार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. मंगळवारपर्यंत कोकण, गोवा, मध्य-महाराष्ट्राच्या घाट परिसरात अतिवृष्टीचा अंदाज असून आज आणि उद्या कर्नाटकच्या किनारपट्टीवर आणि दक्षिण कर्नाटकात अत्यंत मुसळधार

पावसाचा अंदाज वर्तवला आहे. त्याचबरोबर तेलंगण, मराठवाडा आणि विदर्भात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

//<><><><><>//